Progressive Education Society's

# MODERN COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE

Ganeshkhind, Pune 411016

# NOTICE

To be put up on 25 JUL 2020

To be removed on

Class

**विषय - कोव्हीड-१९ चा प्रादूर्भाव कमी करणेकामी प्रतिबंधात्मक उपाययोजना**

**संदर्भ** – १.पुणे महानगरपालिका आयुक्त कार्यालय जा.क्र.मआ/साप्रवि/२७०३ दिनांक २३ जुलै,२०२०.
२.पिंपरी चिंचवड महानगरपालिका जा.क्र.वैद्य/०९/४१२६/२०२० दिनांक २३ जुलै,२०२०.
३. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे परिपत्रक क्र.२१३/२०२० दि.२४ जुलै, २०२०.

सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना सूचित करण्यात येते की सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिपत्रक क्र.२१३/२०२० दि.२४ जुलै, २०२० नुसार कोव्हीड-१९ चा प्रादूर्भाव कमी करणेकामी प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत सर्व महाविद्यालयांसाठी निर्गमित करण्यात आलेले आदेश खालीलप्रमाणे :

१. प्राचार्य, सर्व उपप्राचार्य, सर्व शाखांचे विभागप्रमुख, प्रशासकीय विभागप्रमुख गट-ड मधील सर्व सेवक (रजेवर असलेल्यांखेरीज) नियमितपणे उपस्थित राहतील. गट-क मधील शिक्षकेतर सेवकांपैकी ५०% प्रमाणे आळीपाळीने (Rotation) सेवकांना कार्यालयात बोलावून कार्यालयीन कामकाज करुन घेण्यात यावे. अशाप्रकारे ज्या कर्मचा-यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट मिळेल, त्यांनी घरी राहून (Work From Home) कार्यालयीन काम करावे. रजेवर असणा-या कर्मचा-यांचा यात समावेश करू नये.

२. शिक्षकांची एकूण संख्या अथवा १५ शिक्षक यापैकी जे कमी असेल एवढया शिक्षकांनी विभागामध्ये उपस्थित रहावे.

३. प्रतिबंधित क्षेत्रातील (Containment Zones) तसेच रजेवर (अर्जित/परिवर्तीत/अर्धपगारी/ विनावेतन) असणारे सेवक वगळता इतर सेवक कोणत्याही कारणाने अनुपस्थित राहील्यास त्यांची अनुपस्थिती अनुज्ञेय/ विनावेतन रजा म्हणून नियमीत करण्यात येईल.

४. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक : समय २०२०/प्र.क्र.४१/१८(र.वका.), दिनांक २३ जुलै, २०२० अन्वये गर्भवती महिला तसेच अवयव प्रत्यारोपण केलेले, केमो थेरपी, इम्युनोसप्रेसिव्ह थेरपी घेत असलेले अधिकारी/सेवक हे कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट मिळण्यास पात्र असतील. त्यासाठी त्यांनी वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

५. सर्व विभागप्रमुख/शाखाप्रमुख यांनी त्यांच्या विभागातील कर्मचारी/सेवकांची उपस्थिती नियंत्रित करावी. तसेच जे कर्मचारी/सेवक यांनी लॉकडाऊनच्या कालावधीत विनापरवानगी मुख्यालय सोडले आहे त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा(वर्तणूक) नियम, १९७९ अंतर्गत शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. कोणीही कार्यालयाची पूर्वपरवानगी न घेता मुख्यालय सोडू नये.

६. सद्य परिस्थितीत संसर्ग टाळण्याच्या दृष्टीने लॉकडाऊनच्या कालावधीत बायोमॅट्रिक हजेरी प्रणालीच्या Face Recognition System चा वापर करावा. जर सदर हजेरी नोंदवताना काही त्रूटी असल्यास त्याबाबत त्वरीत महाविद्यालयाच्या कार्यालयात कळवावे.

७. प्रतिबंधित क्षेत्रात (Containment Zones) निवास असणा-या शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना घरी राहून (Work From Home) काम करण्याबाबत परवानगी घ्यावी आणि अशा सेवकांनी सोबत जोडलेल्या प्रपत्रात माहीती भरुन कार्यालयात मुख्य लिपीक यांचेकडे moderncollege16@gmail.com या इमेल आयडी वर पाठवावे.

८. ज्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना सर्दी, ताप, खोकला किंवा समकक्ष लक्षणे असल्यास अशा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी पूर्वपरवानगीने घरी राहून काम करावे.

यासंदर्भात शासनाचे,विद्यापीठाचे अथवा सक्षम प्राधिकरणाचे काही वेगळे आदेश प्राप्त झाल्यास त्यासंदर्भात स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

Modern College Ganeshkhind, Pune-16

प्राचार्य

# प्रतिबंधित क्षेत्रात रहिवास असल्याबाबतचे घोषणापत्र

कर्मचा-याचे नाव : ______________________________

पदनाम : ______________________________

विभाग : ______________________________

निवासाचा पत्ता : ______________________________

______________________________

______________________________

______________________________

मी नमूद करतो की, वर नमूद केलेल्या पत्त्यावर मी राहत असून पुणे/पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने दिनांक २३ जुलै, २०२० रोजी घोषीत केलेल्या प्रतिबंधित क्षेत्रात (Containment Zones) माझ्या निवासस्थानाचा आज रोजी समावेश आहे.

सदर बाब विचारात घेऊन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिपत्रक क्र.२१३/२०२० व महाविद्यालयाचे निर्देशा अन्वये मला कार्यालयात/महाविद्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट मिळावी, ही विनंती. उपरोक्त प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zones) हटविण्यात आल्यास त्याबाबत महाविद्यालयास तात्काळ कळविण्याची जबाबदारी माझी राहील.

दिनांक : स्वाक्षरी :

कर्मचा-याचे नाव :